आर्थिक व उद्योजकता विकासासाठी प्रेरक मासिक

# अर्थ-उद्योग

RNI-TC MAH MAR 13457/95 वर्ष ७ अंक - ५ -२००२
इंटरनेट आवृत्ती www.arthudyog.com किंमत रू. २०/-

## उद्योजकतेचे अंतरंग


राहूल बजाज


बी. जी. शिर्के


भवरलाल जैन


एम. के. बिरमाणी


सुलज्जा मोटवानी


अशोक कटारिया


किसनलाल सारडा


के. एल. खन्ना


राधाकिसन चांडक


इलियास डिसुझा


धिरुभाई, मुकेश, अनिल अंबाणी


आर. एस.शेठी


शशिकांत शेट्टी


सुरज शहा


योगेश कनाणी


संतोष पलोड


विनायक शेंबेकर


विलास शेंबेकर


गोपी मयूर


गंगाधर बुरकुले


नेमीचंद पोद्दार


कांतीलाल बाफणा


झुंबरलाल भंडारी


बाबुराव सोनार


रतिलाल पटेल

# या अंकात


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| या अंकात | २ |
| यशस्वी व्यवस्थापन आणि ली आयोका | ३ |
| धिरूभाई अंबानी (रिलायन्स इंडस्ट्रीज ) | ४ |
| ललितकुमार जैन (ललित कन्स्ट्रक्शन, कुमार जेनेटिक ) | ६ |
| राहूल बजाज ( बजाज उद्योगसमुह ) | ७ |
| बी. जी. शिर्के ( शिपोरेक्स उद्योगसमुह ) | ८ |
| भवरलाल जैन ( जैन उद्योगसमुह ) | १२ |
| एम.के.बिरमानी ( शिवानंद इलेक्ट्रॉनिक्स ) | १४ |
| सुलज्जा मोटवाणी ( कायनेटिक इंजिनिरींग ) | १५ |
| अशोक कटारिया ( अशोका ग्रुप ) | १६ |
| किसनलाल सारडा ( सारडा उद्योगसमुह ) | १८ |
| के. एल. खन्ना ( इ.पी.सी. इंडस्ट्री ) | २२ |
| राधाकिसन चांडक ( चांडक उद्योगसमुह, पंचवटी हॉटेल्स ग्रुप ) | २४ |
| एलियास डिसुझा ( सी.अँड एम. ग्रुप ) | २८ |
| आर. आर. शेठी ( तारकेश्वरा हॅचरिज ) | ३० |
| शशी शेट्टी ( मल्टिमोल समुह ) | ३२ |
| सुरज शहा ( शहा उद्योगसमुह सिन्नर ) | ३३ |
| योगेश कनानी ( टंकोसी ) | ३४ |
| चंद्रकांम हिप्पळगावकर (नाशिक स्टील्स) | ३४ |
| ठक्कर्स डेव्हलपर्स | ३५ |
| संतोष पलोड ( आनंद उद्योगसमुह ) | ३६ |
| दिपक कन्स्ट्रक्शन | ३७ |
| गोपी मयूर ( मयुर ट्रॅक्टर्स ) | ३८ |
| रतिलाल पटेल ( मधूर, मोहन कन्स्ट्रवेल ) | ४० |
| नागराज देवरे (अतुल फ्रुड प्रॉडक्टस) | ४१ |
| गंगाधर बुरकुले ( बुरकुले उद्योगसमुह ) | ४२ |
| विजू नाना (राजाराम जी. पाटील ) | ४३ |
| नेमीचंद पोद्दार ( पोद्दार उद्योगसमुह ) | ४४ |
| कांतीलाल बाफणा ( बाफणा उद्योगसमुह ) | ४६ |
| ताराचंद गुप्ता, पवनकुमार गुप्ता ( मंगल कन्स्ट्रक्शन ) | ४७ |
| झुंबरलाल भंडारी ( ड्रिप इंडिया ) | ४८ |
| बाबुराव सोनार ( ॲबेलिन ग्रूप ) | ४९ |


**अर्थ-उद्योग**

या अंकाची दुसरी आवृत्तीही लवकरच प्रसिद्ध होत आहे. -
संपादक

# गुंतवणूक नेहमी माणसात असावी



भवरलाल जैन

*मी मारवाडी समाजातला, म्हणजे मारवाडयाचा पुत्र. त्याचे काम काय? अर्थातच धंदा ! मारवाड्याचा जन्म नोकऱ्या देण्यासाठी आहे. करण्यासाठी नाही म्हणून उद्योग व्यवसायात आलो. परंतु केवळ मारवाडी समाजातच जन्म घेणे उद्योग व्यवसायात यशस्वी होण्यासाठी पुरसे होत नाही. त्यासाठी परिश्रमांची गरज असते. काही तत्वेही असावी लागतात. मी विशिष्ठ तत्व घेऊनच जन्माला आलो आहे. व्यवसायातही काही तत्वे घेऊन चाललो हेही खरे आहे. परंतु तडजोडी ह्या कराव्याच लागतात. कारण तडजोडीविना जगताच येईल असे नाही. अशी आजची परिस्थिती आहे. या संदर्भात जॉर्ज वॉशिंग्टनचं चरित्र खूप काही शिकवून गेलं. व्यवसायात काही तडजोडी केल्यात पण काही लक्ष्मणरेषाही पाळल्यात. यासंदर्भात एक अनुभव मुद्दाम सांगावसा वाटतो. आम्हाला काही परवाने हवे होते. त्यासाठी माझे अधिकारी दिल्लीला गेले. तेथे त्यांनी*

(पुढील पानावर)



# जळगांवला कृषी क्षेत्रातील सर्वांगीण प्रगतीचा विलोभनिय अविष्कार

निसर्गातील बहुमूल्य साधनस्त्रोतांचा विविध पर्यायांद्वारे वापर किंवा त्यांचेच मोल वाढवून केलल्या अथक प्रयत्नांचा परिपाक म्हणजेच जळगाव स्थित ५००० दशलक्ष रुपयांची उलाढाल असणाऱ्या जैन उद्योग समुहाचे प्रत्येक उत्पादन. हा केवळ योगायोग नव्हे तर निसर्गाच्या जपणुकीविषयी वाटणाऱ्या आत्मियतेतन साकार केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे. हा विश्वास उद्योगाच्या आघाडीवरच्या दोन कंपन्यांच्या कामात आणि विस्तारामध्ये प्रतिबिंबित होतो. जैन प्लास्टिक्स अँड केमिकल्स लि. आणि जैन इरिगेशनल सिस्टिम्स लि. ह्या त्या दोन कंपन्या.

जैन प्लॅस्टिक्स अँड केमिकल्स लि. ही कंपनी शुद्ध पपेन, कांदा व पालेभाज्यांचे निर्जलीकरण, फळे व पालेभाज्यांवर प्रक्रिया आणि इरीगेशन पाईप्सच्या व्यवसायात आहे. आणि जैन इरिगेशन ही कंपनी ठिबक सिंचन, तुषार सिंचन, उती संवर्धन, हरित गृहे, विद्राव्य खते, सौरबंब, आणि प्लास्टिक उत्पादनांच्या व्यवसायात आहे. उद्योग समुहाची स्वतःची काही वैशिष्ट्ये आहेत. सर्वाधिक शुद्ध पपेनचे एकमेव उत्पादक, भारतातील पीव्हीसी पाईप्सचे सर्वात मोठे उत्पादक, भारतातील ठिबक सिंचन पद्धीचे प्रणेते, एका छताखाली विविध प्लास्टिक शीट बनविणारे एकमेव उत्पादक आणि पपेन व शीट विभागास जर्मनी कडून प्रशस्तीपत्रक.

गोरख पगार

परिसरात खालील प्रकल्प आहेत.

अ) शेतमालावर आधारित उद्योग :

१) पपई चिकापासून शुद्ध पपेन पावडर

२) कडूनिंबापासून किटकनाशके.

३) टिश्यु कल्चर (उती संवर्धन) द्वारे केळी रोपांचे उत्पादन.

४) विद्राव्य व द्रवरुप खते.

५) कांदा व भाजीपाला निर्जलीकरण.

६) आंबा, केळी व इतर फळांपासून पल्प व कॉन्सन्ट्रेट.

७) फळ भाजीपाला प्रक्रिया प्रकल्पातून निघणाऱ्या सालट्यांपासून गांडूळाद्वारे खत निर्मिती.

अ) टिश्यु कल्चर व विद्राव्य खते :

टिश्यू कल्चर तंत्रज्ञानाद्वारे निर्मित

उच्च प्रतिच्या केळी रोपाच्या लागवडीची प्रात्यक्षिके शेतकऱ्यांच्या शेतावर व कंपनीच्या प्रक्षेत्रावर ठिबक व द्रवरुप खते वापरुन घेण्यात येतात याचा मुख्य उद्देश असा की ठिबक सिंचन व द्रवरुप खते वापरल्यामुळे केळी उत्पादनात व प्रतिमध्ये होणारी वाढ शेतकऱ्यांना समजावी. केंद्रातील परिसरात बाराहून अधिक फळपिके ठिबक सिंचन व द्रवरुप खते वापरुन यशस्वीपणे वाढविण्यात आलेली आहेत.

ब) पाणी आडवा पाणी जिरवा :

जलसंधारणाचे काम हाती घेऊन केंद्राच्या परिसरात पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे पावसाचे वाहून जाणारे व नदी - नाल्यांना मिळणारे पाणी अडवून ते पाझर तलावात साठविले जाते. या साठविलेल्या पाण्यामुळे भूजल साठ्यामध्ये वाढ होऊन परिसरातील विहीरींच्या पाणीसाठ्यात वाढ झाली.

क) सूक्ष्मसिंचन पद्धतींचे प्रात्याक्षिक :

भेट देणाऱ्या शेतकऱ्यांना व अभ्यासू नागरिकांना सूक्ष्मसिंचनाविषयी अधिक माहिती देण्यासाठी वेगवेगळया सूक्ष्मसिंचन पद्धतींचे प्रात्याक्षिक केंद्र परिसरात उभे केलेले आहे. यामध्ये ड्रिपर्स लाईन ट्यूबींग, तुषार सिंचन, सूक्ष्मतूषार

सिंचन, फंगस, मिस्टर्स, मयुरपंखी सिंचन पद्धती व त्याला लागणाऱ्या वेगवेगळया फिल्टर्सची प्रात्याक्षिके आहेत. यामध्ये द्रवरुप खते देण्याच्या वेगवेगळया पद्धतींची उभारणी पण केलेली आहे.

ड) माळरान व घळीच्या जमिनीचा विकास

माळरान जमिनीवरील टेकड्यांना योग्य अंतरावर समपातळीतील खाचरे करण्यात येऊन त्यावर आंबा कलमे लावण्यात आलेली आहेत. सपाट खाचरांवर सुपिक माती टाकून त्यावर कांदा व भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. चढउताराच्या घळीच्या भागात भूमि व जलसंधारणाची सर्वंकष कामे हाती घेऊन त्यांचा विकास करण्यात आलेला आहे. ठिबक सिंचन पद्धातीचा अवलंब केल्यामुळे जमिनीचे संपूर्ण सपाटीकरण करण्याचा खर्चिक मार्ग न पत्कारता अशा जमिनींवर फळबाग व भाजीपाला लागवड होते हे भेट देणाऱ्या शेतकऱ्यांना या प्रात्याक्षिकातून दाखवले जाते.

इ) हरित गृहे :

हरितगृहांमध्ये पिक वाढीसाठी योग्य असे वातावरण म्हणजेच तापमान, आर्द्रता, सुयप्रकाश राखता येतो. ज्यायोगे वर्षभर कोणतेही पिक आपल्याला घेता येते. हरितगृहांमध्ये थंड करण्यासाठी ताट्या खते देण्याची साधने, हवा खेळती राहण्यासाठी पंखे इत्यादी गोष्टी संगणकाच्या सहाय्याने कार्यान्वित करण्यात येतात केंद्रामध्ये अशा तऱ्हेची संपूर्ण संगणकावर नियंत्रीत होणारी २००० वर्ग मीटर क्षेत्रफळाची दोन हरितगृहे आहेत. चार छोटी हरितगृहे, पाच छोटी बोगद्यासारखी हरीतगृहे असून त्यावर अतिनील किरणे (यु. व्ही.) विरोधक प्लॅस्टिकचे आच्छादन असून त्यांना ताट्या व पंखे जोडलेले आहेत. या हरितगृहांचा वापर उतिसंवर्धित केळी रोपांना काटक बनविण्यासाठी करण्यात येतो. एका वेळी यामध्ये दोन लक्ष केळी रोपे वाढविण्यात येतात. तसेच त्यामध्ये दोन लक्ष केळी रोपे वाढविण्यात येतात. तसेच त्यामध्ये संकरीत टमाटे, सिमला मिर्ची, स्ट्रॉबेरी यासारखी पिके पण घेण्यात येतात. एक हजार एकरांवर पसरलेला हा प्रकल्प आहे.

येथे कृषी विद्यापिठात होणारे संशोधन चालू आहे, प्रगत देशांमध्ये ज्या पद्धतीने, तंत्रांनी शेती केली जाते त्याचे दर्शन आहे. थोडक्यात भारतीय शेतकऱ्यांसाठी चालते बोलते कृषी विद्यापीठच आहे असं म्हटले तरी वावगे ठरू नये. महत्वाचे म्हणजे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावयाचा दृष्टीकोणही येथे आहे.

*भारतात प्रकाश, हवा, जमिन आणि पाणी भरपूर आहे त्याचा उपयोग करायला हवा. विश्वासार्हता असेल तर पैसे कमी पडत नाहीत. सरळमार्गाने आणि प्रामाणिकपणाने पैसा कमविता येतो. चांगल्या कामात स्पर्धेची भिती नसते. गरज आहे ती फक्त कठोर परिश्रमांची. माणसाने नेहमी माणसातच गुंतवणूक केली तर काहीही कमी पडत नाही.*

*संबंधितांशी चर्चा केली. त्यांच्या काही अटी लाच-लुचपत खाणे-पिणे आदि होत्या. त्या शक्य तेवढया पुर्ण कराव्यात असे मी माझ्या अधिकाऱ्यांना सुचविले. परंतु त्याही पुढे त्यांची मजल गेली...लाच, बाटली दिली गेली वर बास ची अपेक्षा. माझ्या अधिकाऱ्यांनी मला हे कळविले. आणि त्यांना मी तडक जळगावला निघून या. आपल्याला परवाने नकोत असा निरोप पाठविला. अशा लक्ष्मणरेखा पाळायलाच हव्यात. अशा काही लक्ष्मणरेषा पाळल्या नाहीत तर जीवनात सौख्य राहणार नाही. कठोर परिश्रमांनीच माणूस चांगला व्यवसायिक होऊ शकतो. आपल्या देशाची प्रगती फक्त शेतीच्या माध्यमातुनच होईल. आजचे कॉलेजेस म्हणजे नोकरदार निर्माण करणारे कारखाने आहेत. नोकरीपेक्षा शेती उद्योग अधिक देउ शकतो. इतर कारखानदारीनेदेखील देशाची भरभराट होईल या गोष्टीवर माझा विश्वास नाही. भारतात प्रकाश, हवा, जमिन आणि पाणी भरपूर आहे त्याचा उपयोग करायला हवा. विश्वासार्हता असेल तर पैसे कमी नडत नाहीत. सरळमार्गाने आणि प्रामाणिकपणाने पैसा कमविता येतो. चांगल्या कामात स्पर्धेची भिती नसते. गरज आहे ती फक्त कठोर परिश्रमांची. अनेक मोठी माणसे निष्पाप असतात असे नाही. मुसोलिनी, हिटलरसारखी माणसे पाप अधिक असलेलीच होती. त्यामुळे अशा प्रकारच्या मोठेपणाचे आकर्षण असू नये. सभोवताली माणसे निर्माण करता येतात. माणसाने नेहमी माणसातच गुंतवणूक केली तर काहीही कमी पडत नाही. माणसाने भरपुर परिश्रम करावेत. स्वत: समाधान मिळविण्याइतके. त्यामुळे चॉईस तुमचाच असावा. क्वान्टिपेक्षा क्वालिटी महत्वाची मानावी. पैशाचा विचार कधी करू नये. आपण कोणीतरी आहोत असे गृहित धरू नये. आदि बाबींचा आपल्या जिवनात समन्वय साधून चांगले करून दाखविण्याची स्वप्ने अवश्य पाहावित. परिश्रमाशिवाय पैसा विद्रोह निर्माण करतो. असा पैसा जेथे असतो तेथे शांती नसते.*